मुंबई टाइम्स

बुधवार, १६ जुलै २००८ ■ महाराष्ट्र टाइम्स







- पाच महिने गाडी डीलरकडेच
- 'एनओसी' लिहून देण्याचा कंपनीचा आग्रह

# सावधान...

## अधिकृत डीलरच चोरतोय गाडीचे पार्ट्स!





● सौमित्र पोटे

गाडी बिघडली किंवा अपघातग्रस्त झाली तर आपण डोळे मिटून ती गाडी डीलरकडेच दुरुस्तीसाठी देतो. कंपनीच्या अधिकृत डीलरवर आपला विश्वास असतो. पण डीलरकडून गाडी आणल्यानंतर ओरिजिनल पार्ट्सच्या जागी बनावट पार्ट्स टाकल्याचं जर आपल्या ध्यानात आलं तर? अशीच परिस्थिती अंधेरीच्या हरीश कांचन यांच्या गाडीची झालीय. ह्याच्या प्रकाराबद्दल 'स्कोडा'शी पत्रव्यवहार करता करता १० दिवसांत मिळणारी गाडी तब्बल पाच महिने उलटूनही दारात आलेली नाही. कंपनीही डीलरला पाठीशी घालत असल्याने अखेर कांचन यांनी कन्झ्युमर कोर्टाचा दरवाजा ठोठावण्याचा निर्णय घेतलाय.

या वर्षी २९ फेब्रुवारीला कांचन यांच्या कारला अपघात झाला. गाडी जिथून घेतली तिथेच दुरुस्तीला देण्याच्या नियमानुसार त्यांनी चेंबूरच्या 'न्यूमरीन्स' या स्कोडाच्या अधिकृत डीलरकडे दिली. त्या वेळी ही गाडी आठ मार्चला परत देण्याचं 'न्यूमरीन्स'च्या अपघात विभाग व्यवस्थापकांनी कांचन यांना कळवलं. प्रत्यक्षात एक एप्रिलपर्यंत गाडी मिळाली नाही. जेव्हा मिळाली, तेव्हा गाडीतील आरसे, व्ही बेल्ट, बॅटरी, क्लच, एसी, फ्यूज बॉक्स, रेडिएटर फॅन, ब्रेक डिस्क, अल्टरनेटर बेल्ट आदी ओरिजिनल पार्ट्सची जागा बनावट पार्ट्सनी घेतलेली दिसली. त्याचं बिल मात्र एक लाख ९४ हजारांच्या घरात होतं. हा प्रकार 'स्कोडा'ला कळवल्यानंतर इन्स्पेक्शनसाठी ही गाडी भांडुपच्या 'जेएमडी ऑटो'कडे देण्याचं 'स्कोडा'ने सांगितलं. त्यानुसार 'न्यूमरीन्स'चे पैसे भरून गाडी 'जेएमडी ऑटो'मध्ये दाखल केली गेली.

स्कोडा, औरंगाबादचे इंजिनीअर रामकृष्ण सुरभी यांनी या गाडीची पाहणी करून फोटोंसह रीतसर अहवाल कंपनीकडे पाठवला. नंतर कंपनीच्या सूचनेप्रमाणे 'जेएमडी'मार्फत सर्व ओरिजिनल पार्ट्स परत बसवले गेले. हे नवं बिल चार लाख ४० हजारांच्या घरात झालं. पैकी 'न्यूमरीन्स'तर्फे पहिल्यांदा दोन लाख २० हजारांचा चेक 'जेएमडी'कडे पाठवण्यात आला. पण पूर्ण रक्कम नसल्याने 'जेएमडी'ने तो परत पाठवला. आज अखेरपर्यंत डीलरकडून पूर्ण रकमेचा चेक 'जेएमडी'ला मिळालेला नाही. गाडी ताब्यात हवी असेल तर बनावट पार्ट्स आणि एकूण प्रकरणाबद्दल 'एनओसी' लिहून देण्याची अट 'स्कोडा'ने घातलीय. अन्यथा साडेचार लाखांचं बिल भरण्याचा पर्याय देण्यात आलाय. पहिल्या १.९४ लाखांचा हिशेब कंपनीने अद्यापि जमेत धरलेलाच नाही.

या गैरप्रकाराबद्दल कांचन यांनी दहा दिवसांपूर्वीच चेंबूरचे डीसीपी दिलीप सावंत यांच्याकडे रीतसर लेखी तक्रारही नोंदवली आहे. कांचन यांनी पोलिसात फिर्याद दिल्याने 'स्कोडा' त्यात कोणताही हस्तक्षेप करणार नाही, पोलिस तपासात जो दोषी आढळेल त्यावर कडक कारवाई करू असं कंपनीचे व्यापार विकास अधिकारी कार्तिक रमेश यांनी सांगितलं. कंपनीच्या औदासीन्याला कंटाळून कांचन यांनी कन्झ्युमर कोर्टामध्ये धाव घेतलीय. त्यांचे वकील आनंद पटवर्धन म्हणाले, या प्रकरणी कोर्टामध्ये केस दाखल करणार असल्याची नोटिस 'स्कोडा'ला पाठवली असून अद्यापि त्यांच्याकडून उत्तर आलेलं नाही. डीलरने गाडीमधील ओरिजिनल पार्ट्स काढून घेण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले आहेत, असंही ते म्हणाले.

soumitra.pote@timesgroup.com